295

वाचले :- १. म. चेअरमन, इंदिरा महिला सेवा सोसायटी नंदुरबार यांचा दि. १२.११.८६ चा अर्ज.

२. शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक- एलआरएफ-३१८६/५५१/५२५७/ग.६ दिनांक २६.८.८७.

.....

क्रमांक-१९८७/ब/कक्ष.१/बिनशेती.१/ 2863
जिल्हाधिकारी धुळे यांचे कार्यालय
धुळे दिनांक 10 .९.१९८७.

आ दे श :

शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक- एलआरएफ-३१८६/५५१-५२५७-ग.६ दिनांक २६.८.८७ अन्वये नंदुरबार स.नं. २७१-अ पैकी हे.०.२० आर जमीन इंदिरा महिला सेवा सोसायटी म. नंदुरबार या संस्थेस अध्यापक विद्यालय, पशुधान पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, अनाथ निराधार बालकाश्रम इ. इमारती साठी मंजूर करणे बाबत आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने मी जिल्हाधिकारी धुळे असे आदेश देतो की, नंदुरबार येथील स.नं. २७१-अ पैकी हे.०.२० आर जमीन [पानांक २७९ वरील नकाशात १,२,३,४, अंकांनी दाखविल्याप्रमाणे ] म. चेअरमन इंदिरा महिला सेवा सोसायटी म. नंदुरबार या संस्थेस अध्यापक विद्यालय, पशुधान पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, अनाथ निराधार बालकाश्रम इमारतीसाठी महसूल मुक्त व मोफत क.ह. रक्कम रु. ५६१४/- [ पांच हजार सहाशे चौदा मात्रचर ] महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट ] नियम १९७१ मधील नियम ६ तरतुदीनुसार खालील शर्तीस आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

शर्ती :-

१] सदरचा आदेश महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमाचे तरतुदीनुसार काढणेत आला असून त्या सर्व तरतुदी अर्जदार संस्थेस बंधनकारक राहतील.

२] अर्जदार संस्था सदरचा भूखंड वर्ग २ वर धारण करील.

३] मंजूर केलेल्या जमिनीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा किंवा त्यातील कोणताही हित संबंध राज्य शासनाच्या पूर्वानुमती विनाहस्तांतरित करु नये.

४] प्रश्नाधीन जमिनीचा वापर मंजूर केलेल्या कारणासाठीच करावा.

५] मंजूर केलेल्या जमिनीचा किंवा तिचा कोणताही भाग किंवा त्यातील कोणताही हित संबंध राज्य शासनाच्या पूर्वानुमती विनाहस्तांतरित करु नये.

६] जागा मंजुरीच्या आदेशापासून दोन वर्षाचे आंत सदरची जागा

..२

मंजूर केलेल्या प्रयोजनासाठी सर्व प्रकारे सिध्द ठेवावी व तिचा पूर्ण त्याच प्रयोजनासाठी वापर करावा.

७] जागेवर बांधकाम करण्यापूर्वी बांधकामाचे आराखडे नंदुरबार नगर परिषदेकडून मंजूर करुन घ्यावेत व बांधकाम करतांना रिबन डेव्हलपमेंट रुल्सचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच बांधकाम पूर्ण झालेवर त्या मध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय फेरफार करु नये.

८] उक्त जमिन किंवा तिच्यावरील बांधकाम कोणत्याही वेळी राज्य सरकारच्या लेखी पूर्व परवानगी विना नियोजीत प्रयोजना व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजना करिता तात्पुरती किंवा कायम प्रकारे वापरण्यात येवू नये.

८] जागेचा ताबा घेतल्या पासून दोन वर्षाचे कालावधीत त्या जागेत १०० चौ.मी. ला एक झाड या प्रमाणे सुयोग्य झाडांची लागवण करावी. व त्यांची देखभाल करावी.

९] वरील शर्त क्रमांक १ ते ८ पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास सदरची जमीन त्यावरील बांधकामासह सरकार ताब्यात घेईल.

१०] सदर जमिन कोणत्याहीसार्वजनिक प्रयोजनासाठी राज्य सरकारला हवी असल्यास त्या बाबतीत जिल्हाधिकारी यांच्या सहीचे जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे. असे घोषणापत्र मंजूरी दिलेली व्यक्ती आणि राज्य सरकार यांना निर्णायक ठरेल किंवा भू संपादन अधिनियम १८९४ अन्वये राज्य सरकारने संपादनासाठी उक्त जमीन अधिसूचित केल्यास उक्त भूधारक किंवा व्यवस्थापकास सहा महिन्याची नोटी सूचना देवून सरकारने खालील मार्ग अवलंबिणे कायदेशिर होईल.

कोणत्याही व्यक्तीचा हक्क किंवाअधिकार या पासून पूर्णपणे मुक्त असा उक्त जमिन वत्या जमिनीवर उभारलेल्या कोणत्याही इमारती किंवा केलेले इतर बांधकाम नुकसान भरपाई देवून परत घेणे किंवा तिचा ताबा घेणे, नुकसान भरपाईची रक्कम ही जमीन परत घेण्याच्या वेळी उक्त जमिनीवर मंजूरी दिलेल्या उक्त व्यक्तीने अनधिकृतपणे बांधलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम यांचा खर्च किंवा मुल्य यापैकी जे कमी असेल त्या पेक्षा जास्त असणार नाही. या शर्ती खाली द्यावयाच्या भरपाईच्या रकमेच्या पर्यायाने संबंधी कोणताही प्रश्न उद्भवल्यास असा प्रश्न निर्णया करिता राज्य शासनाकडेस सोपवावा आणि राज्य शासनाच्या अंतीम निर्णय असेल.

११] ही मंजूरी खाणी, खनिज पदार्थ आणि दगड खाणी यामधील शासनाच्या सर्व हक्काच्या आरक्षणास आणि दगड खाणीचे काम करणे व दगड खाणीचा शोध करणे या प्रयोजनाकरिता या क्षेत्रास प्रवेश करण्यास संहितेतील उपबंधानुसार सर्व वाजवी सोयीसह पूर्ण मोकळीक असल्याच्या अधीन राहून देण्यात आली आहे.

...३..

१२] जमीन असेल त्या स्थितीमध्ये मंजूर करण्यात येत असून तिच्या विकासाचा खर्च भूधारकास सोसावा लागेल.

१३] महाराष्ट्र जमिन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट ] नियम १९७१ मधील नियम ६ लगत फॉर्म नं. १ मध्ये संस्थेने सनद करुन द्यावी.

१४] वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग अनुग्राही संस्थेने केल्यास सदरची जमीन त्यावरील बांधकामासह सरकार जमा करण्यात येईल.

स्थळ प्रतीवर
म. जिल्हाधिकारी सो.
यांची स्वाक्षरी. आहे.

सही/-
जिल्हाधिकारी धुळे करिता.

प्रति,
म. चेअरमन, इंदिरा महिला सेवा सोसायटी लि. नंदुरबार जि. धुळे.

प्रतिलिपी - मुळ कागदपत्रासह म. तहसिलदार नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- अर्जदार संस्थेकडून विहित नमुन्यात कबुलायत करुन इकडेस मंजूरीसाठी सादर करावी.

३/- संदर्भीय जमिनीचा अर्जदार संस्थेस ताबा देवून ताबे पावतीसह खुलासा करावा.

प्रत - म. जिल्हा निरिक्षक भूमी अभिलेख धुळे यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जिल्हाधिकारी धुळे करिता.

Copy applied on- 10-10-2005 Copying Fee- 6-00
Copy Ready on- 11-11-2005 Compairing Fee- 3-00
Copy Delivered on- 14-11-2005 Paper Fee- 1-00
Copied by- Search Fee- -
Compaired by- Total- 10-00

TRUE COPY
Tahasildar Nandurbar

नंदुरबार